REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 3.8014(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 4 | JANUARY – 2017

# महाराष्ट्र शासनाच्या अनुसूचित जातीच्या सक्षमीकरणाच्या धोरणाचाआढावा.



**प्रा. कांबळे अनिल पंढरीनाथ**
**कला व वाणिज्य महाविद्यालय , माढा.**

## प्रस्तावना:-

भारतीय समाज व्यवस्था विषमतेवर आधारलेली आहे. या समाज व्यवस्थेत श्रेष्ठ आणि कनिष्ठ असे दोन भाग पहावयास मिळतात. ही समाज व्यवस्था प्राचिन काळा पासून भारतात अस्तित्वात असलेली दिसून येते. भारतीय समाजात माणसाची ओळख त्याच्या जातीवरुन होते. ही जातीय व्यवस्था वर्ण व्यवस्थेवर आधारलेली आहे. वर्ण व्यवस्थे मधील अतिशुद्र वर्णा मधील जातींचा समावेश अनुसूचित जाती मध्ये केला गेलेला आहे. भारतीय समाजातील उपेक्षित,दुर्लक्षित आणि आर्थिक दृष्टया कमकुवत असणाऱ्या लोकांचा समावेश अनुसूचित जातीत करण्यात आला आहे. अनुसूचित जातीतील लोकांना दलित,हरिजन या नावाने ही ओळखले जाते.

## अनुसूचित जातीचा अर्थ:-

अनुसूचित जाती म्हणजे सविधानाच्या अनुसूचिमध्ये ज्या जातीचा समावेश आहे त्या जाती होय.

भारतीय राज्यघटनेमध्ये कलम 341 अंतर्गत ज्या जाती, वंश अथवा गट यांचा अनुसूचित जाती असा उल्लेख केला आहे. त्या गटाला अनुसूचित जाती असे म्हणतात. अनुसूचित जाती मध्ये हिंदू,बौध्द,शिख धर्माच्या व्यक्तिशिवाय इतर कोणत्याही धर्माच्या व्यक्तिचा समावेश केला जात नाही. एखाद्या जातीचा अनुसूचि मध्ये समाविष्ठ करण्यासाठी प्रामुख्याने सामाजीक,शौक्षणीक आणि आर्थिक मागासलेपण हा निकष विचारात घेतला जातो. भारतामध्ये जवळपास 1500 जातीचा समावेश अनुसूचित जातीमध्ये करण्यात आला आहे. तर महाराष्ट्रामध्ये जवळ पास 59 जातीचा समावेश अनुसूचित जातीमध्ये करण्यात आला आहे. भारताच्या एकूण लोकसंख्ये मध्ये अनुसूचित जातीच्या लोकसंख्येचे प्रमाण जवळ जवळ 16.2 टक्के आहे.तर महाराष्ट्रामध्ये ते 10.20 टक्के इतके आहे. भारतात आणि महाराष्ट्रात अनुसूचित जातीतील लोकसंख्येत वाढ होत आहे.

## अभ्यासाची उद्दिष्टे :-

1) अनुसूचित जातीचा अर्थ समजून घेणे.
2) अनुसूचित जातीतील लोकांची आर्थिक,समाजिक स्थिती समजून घेणे.
3) अनुसूचित जातीच्या लोकासाठी महाराष्ट्र शासनाच्या धोरणाचा आढावा घेणे.

## संशोधन पध्दती :-

सदर शोध निबंधासाठीची माहिती ही दुय्यम साधनसामुग्रीवर आधारीत आहे. ही माहिती संदर्भपुस्तके वर्तमानपत्रे व महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या संकेत स्थळावरुन घेण्यात आली आहे.

सदर शोध निबंधासाठी 2012 ते 2015 हा कालावधी निवडण्यात आला आहे.

महाराष्ट्र शासनाने अनुसूचित जातीतील लोकांची आर्थिक, सामाजिक आणि शौक्षणिक स्थिती सुधारण्यासाठी विविध योजना चालविलेल्या आहेत. या योजनाच्या माध्यमातून या जातीतील लोकांचे दारीद्रयाचे प्रमाण कमी करुन त्यांना मुख्य प्रवाहात आणणे हा उद्देश आहे. यासाठी महाराष्ट्र शासनाने विविध योजना चालू केल्या आहेत. त्या म्हणजे शैक्षणिकआणि प्रशिक्षण योजना,आर्थिक मदतीसाठी वित्तपुरवठा संस्थेची स्थापना, सामाजिक न्यायासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजना इत्यादीचा उल्लेख करता येईल.

अनुसूचित जातीतील लोकांच्या सबलीकरणासाठी महाराष्ट्र शासनाने ज्या योजना चालू केल्या आहेत त्यातील काही योजनाचा आढावा पुढील प्रमाणे घेण्यात आला आहे.

**अ) शैक्षणिक योजना:-** अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना शिक्षणामध्ये अडचण येऊनये म्हणून शैक्षणिक कर्ज सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या योजनेचा लाभ अनुसूचित जातीतील ज्यास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी घ्यावा ही अपेक्षा आहे. या याजने अंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागानी पुढील प्रमाणे खर्च केला आहे.

| सन | खर्च | लाभार्थी संख्या |
|---|---|---|
| 2012-13 | 7.62 लाख | 16 |
| 2013-14 | 50.66 लाख | 49 |
| 2014-15 | 50.97 लाख | |

**स्त्रोत :- सामाजिक न्याय विभाग महाराष्ट्र शासन**

वरिल आकडेवारी वरुन असे दिसून येते की, शैक्षणिक कर्ज योजनेचा लाभ सन 2012-13 मध्ये कमी विद्यार्थ्यांनी घेतलेला दिसून येतो. तर या कर्ज योजनेवर सन 2012-13 मध्ये कमी निधी खर्च झाला आहे. या विद्यार्थ्याची शैक्षणिक स्थिती सुधारण्यासाठी आणखीन निधी खर्च करणे आवश्यक आहे. या योजनेमध्ये लाभार्थीची संख्या वाढविण्यासाठी शासनाने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**ब) प्रशिक्षण योजना:-** अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनविण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून प्रशिक्षण योजना चालविली जाते. या योजनेचा खर्च आणि लाभार्थी संख्या पुढील प्रमाणे.

| सन | खर्च | लाभार्थी संख्या |
|---|---|---|
| 2012-13 | 17.54 लाख | 410 |
| 2013-14 | 17.04 लाख | 260 |
| 2014-15 | 10.13 लाख | 726 |

**स्त्रोत :- सामाजिक न्याय विभाग महाराष्ट्र शासन**

वरील आकडेवारी वरुन हे स्पष्ट होते की, महाराष्ट्रातील अनुसूचित जातीतील विद्यार्थ्याची संख्या वाढत असून या योजनेचा लाभ विद्यार्थी घेत आहेत. पण एकूण लोकसंख्येचा विचार करता यावरील खर्च आणि लाभार्थीची संख्या यात वाढ होणे आवश्यक आहे.

**क) मागासवर्गीयाच्यां आर्थिक उन्नतीसाठी योजना:-** महाराष्ट्र शासनाकडून मागासवर्गीयाच्या आर्थिक उन्नतीसाठी ही योजना चालू आहे. महाराष्ट्र शासनाकडून मागासवर्गीयाच्या सहकारी औद्योगिक संस्थाना आर्थिक मदत केली जाते.

| सन | खर्च | लाभार्थी संख्या |
|---|---|---|
| 2012-13 | 1597.05 लाख | 507 |
| 2013-14 | 3153.15 लाख | 1001 |
| 2014-15 | 3597.00 लाख | 1142 |

**स्त्रोत :- सामाजिक न्याय विभाग महाराष्ट्र शासन**

वरील योजने अंतर्गत दिली जाणारी आर्थिक मदत आणि लाभार्थीची संख्या यांचा विचार केला असता या दोन्हीच्या प्रमाणात वाढ होत असलेली दिसून येते. खरे तर अनुसूचित जातीतील लोकांना औद्योगिक क्षेत्रात येण्यासाठी या योजनेने मदत होणार आहे.

**ड) दिर्घकालीन कर्ज योजना :-** मागासवर्गीय लोकांनी उद्योग क्षेत्रात येण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून ही योजना चालवीली जाते. मागासवर्गीयांच्या सहकारी सुतगिरीणीसाठी महाराष्ट्र शासन दिर्घकालीन कर्ज उपलब्ध करुन देते.

| सन | खर्च | लाभार्थी संख्या |
|---|---|---|
| 2012-13 | 3600.00 लाख | 13 |
| 2013-14 | 1600.00 लाख | |
| 2014-15 | 3000.00 लाख | |

**स्त्रोत :- सामाजिक न्याय विभाग महाराष्ट्र शासन**

वरील योजनेचा आढावा घेतला असता असे दिसते की, सन 2013-14 मध्ये या योजने वर कमी खर्च केला गेला आहे. त्याच बरोबर 2012-13 च्या तुलनेत सन 2014-15 मध्ये केलेला खर्च सुध्दा कमी आहे. खरे तर या योजनेवर सरकारच्या खर्चाचे प्रमाण वाढणे आवश्यक आहे. एकूण लाभार्थ्याचा विचार करता लाभार्थ्याची संख्या सुध्दा वाढणे आवश्यक आहे.

इ) मागासवर्गीयांच्या स्वयंसहाय्यता गटासाठी ट्रॅक्टर खरेदी कर्ज योजना
ई) कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण आणि स्वाभीमानी योजना
प)महिला किसान योजना
फ)महिला समृध्दी योजना

अशा प्रकारे महाराष्ट्र शासनाकडून काही योजना सामाजिक न्याय विभागा मार्फत चालविल्या जातात. या योजनामध्ये केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांचा वाटा असतो.

**निष्कर्ष :-**

1) महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या उन्नतीसाठी वरील योजनेसाठीचा निधी पुरेसा नाही.
2) एकूण लोसंख्येचा विचार करता लाभार्थ्याची संख्या कमी आहे.
3) योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नाही.

**शिफारशी:-**

1) महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या लोकसंख्येचा विचार करता शासनाने वरील योजनांवरील निधी मध्ये वाढ करणे आवश्यक आहे.
2) एकुण लाभार्थ्याच्या संख्येत वाढ होणे आवश्यक आहे.
3) वरील योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी लाथार्थ्या पर्यत जाऊन योजनांचे महत्व सांगणे आवश्यक आहे.

**संदर्भ:-**

1) भारतातील दलित समाज- सुखदेव थोरात
2) महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय विभाग अहवाल
3) महाराष्ट्र शासन संकेत स्थळ :- www.mha.nic.in